**Prelim Exam**

**Class 10th**

**Subject : Marathi** **Marks : 80**

**कृतीपत्रिकेसाठी सूचना :-**

(१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(३) उपयोजित लेखनातील कृतीसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत .

(४) विभाग ५ - उपोयोजित लेखन प्र.५(अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१(इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमानुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे .

**विभाग १ : गद्य**

**प्र.१ ला) अ ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) उत्तरे ते लिहा .** **(२)**

(१) पंतांना खात्री होती →

(२) मंडळींच्या प्रशस्तीने पंतांना भीती वाटत होती. →


पंधरवडाभरात फक्त दोन वेळाच साखरभात झाला. एकदा सोकाजीने चोरून काळंबीभात चारला खालच्या मजल्यावरच्या भाउजी पसरटवारांनी एकदा नागपुरी वडाभात पाठवला होता. एवढे अपवाद वगळल्यास भाताला स्पर्श नाही केला. त्यामुळे मुख्यातः चरबीयुक्त द्रव्ये शरीरात कमी गेली. माझा एकूण निश्चय पाहून चाळीतल्या मंडळींचे आदर दुणावल्याचे माझ्या सूक्ष्म नजरेतून सुटत नव्हते.जी मंडळी माझी, माझ्या डाएटची आणि उपासाची चेष्टा करत होती त्यांनीच "पंत, फरक दिसतो हं! " अशी कबुली द्यायला सूरूवात केली.

जनोबा रेग्यांसारख्या अत्यंत कुजकट शेजाऱ्यालाही "पंत , भलतेच काय हो रोडावलेत." असे मान्य करावे लागले. मंडळींच्या प्रशस्तीने मला भीती वाटत होती ती एकाच गोष्टीची म्हणजे मूठभर मांस वाढण्याची ; पण असली तुरळक तारीफ एकूण मी चालण्यासारखा नव्हतो .

इतक्या असामान्य मनोनिग्रह आणि जिव्हानियंत्रणानंतर कमीत कमी वीस ते पंचवीस पौडांनी तरी माझे वजन घटले पाहिजे अशी माझी खात्री होती. व त्या खात्रीने मी आमच्या ऑफिससमोरच्या वजनाच्या यंत्रावर पाय ठेवला आणि आणेली टाकून तिकीट काढले . महिन्यापूर्वी याच यंत्राने माझे वजन एकशे एक्याऐंशी पौंड दाखवले होते.एक महिन्याचा उपास, निराहार, शास्त्रोक्त आहार, दोरीवरच्या उड्या इत्यादी उग्र साधना केल्यावर आज तिकिटावर वजन.....

मिनिटभर माझा विश्वासच बसेना . एकशे ब्याण्णव पौंड आणि भविष्य होते : "आप बहुत समजदार और गंभीर है! " हल्ली मी वजन आणि भविष्य या दोन्ही गोष्टीची चिंता करायचे सोडून दिले आहे आणि विशेषतः डाएटच्या आहारी तर या जन्मात जाणार नाही. छे, छे, वजनाचा मार्ग भलत्याच काटयातून जातो.

**(२) आकृती पूर्ण करा .** **(२)**



(३) स्वमत :- उपास करूनही पंतांचे वजन वाढण्यामागचे कारण कोणते असावे असे तुम्हाला वाटते. **(३)**

**प्र.१ ला) आ) उताऱ्याचा आधारे सूचनेनुसार कृती करा**.

**(१) आकृती पूर्ण करा**. **(२)**

वाघिणीच्या पिल्लांचे संभाव्य शत्रू → [ ] → [ ]

वाघीण रात्रीच पिल्लांना नाल्याकाठच्या जांभळीच्या दाट झुडपात लपवून शिकारीसाठी गेली होती. या परिसरात दुसरे नर वाघ,बिबळा, रानकुत्री अशा पिल्लांच्या संभाव्य शत्रूंचा राबता होताच . त्यामुळं तिला ही खबरदारी घेणं आवश्यकच होतं. वाघांच्या लहान पिल्लांना इतर भक्षकांपासून खूपच धोका असतो . त्यामुळं वाघीण पिल्लाच्या सुरक्षेबद्दल भलतीच दक्ष असते. आता ती रात्रभर जंगलात फिरून पिल्लांजवळ परत आली होती. आईची हाक ऐकताच अजूनवर दडून बसलेली पिल्लं खेळकरपणे तिच्याकडं झेपावली होती. तेवढ्यात नाल्याच्या डावीकडच्या विरळ बांबूंमधून मला वाघीण येताना दिसली.ती सरळ पाण्याजवळ आली आणि वळून पाण्यात बसली . रात्रभरच्या वाटचालीनं थकून ती विश्रांती घेत होती ; पण पिल्लांच्या उत्साहाला आई बघताच उधाण आलं होत. त्यांतील एका पिल्लानं तर वाघिणीचया पाठीवरच उडी घेतली ; पण तिथून घसरल्यानं ते धपकन पाण्यात पडलं. तोंडावर पाणी उडताच वाघिणीनं मंदपणे गुरगुरुन नापसंती व्यक्त केली ; पण पिल्लांना त्याच्याशी काहीच देणं - घेणं नव्हतं . त्यांचा आईच्याभोवती जबरदस्त दंगाधोपा सुरु झाला.

साधारणतः कुत्र्यापेक्षा लहान आकाराची ही पाच महिन्यांची पिल्लं होती. या वयात लहान मुलं जशी खेळकर असतात, तशीच ही खेळकर होती. एकमेकांचा पाठलाग करणं , मारामारी करणं , पाण्यात उड्या घेणं असे खेळ सुरु झाले. मध्येच आई वळून एखाद्या पिल्लाला मायेने चाटत होती. थोडा वेळ बसल्यावर ती पटकन उभी राहिली. डोकं वळवून तिनं हळूच 'ऑऽवऽ' असा आवाज केला. हा पिल्लांना मागं येण्याबद्दलचा इशारा होता. लगेच वळून ती चालायला लागली.

**(२) चौकट पूर्ण करा .** **(२)**

(१) वाघिण कशाबद्दल दक्ष असते. → [ ]

(२) पिल्ले वयाने ऐवढी होती. → [ ]

**(३) स्वमत** :- डायरी लिहिणे हा छंद प्रत्येकाने जोपासावा, याविषयी तुमचे मत लिहा. **(३)**

**प्र.१ला ) (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृती पूर्ण करा .** **(२)**

कमळाचे फुल यांचे प्रतीक आहे. → [ ] [ ] [ ] [ ]

भारतात आढळणाऱ्या विविध प्रकारच्या सुंदर , सुगंधी फुलांपैकी कमळाच्या फुलाला भारताचे राष्ट्रीय फुल म्हणून ओळखले जाते. या फुलाला हे स्थान प्राप्त होण्यामागे अनेक कारणे आहेत . कमळ म्हणजे पावित्र्याचे दर्शन घडवणारे , सौंदर्याची मुक्त उधळण करणारे , शुभाचे , शालीनतेचे ज्ञानाचे व शांतीचे एक प्रतीक होय. या कमळांच्या असंख्य पाकळ्यांतून एकात्मतेचे दर्शन घडून येते. या सर्व गुणवैशिष्ट्यांमुळे

संविधानात कमळाला राष्ट्रीय फुलाचा दर्जा देण्यात आला आहे . चिखलात जन्मणाऱ्या कमळाची पाने पाण्यावर तरंगत असूनही पाण्याचा एक थेंबही त्याच्या पानांवर टिकत नाही. जणू ती पाने मानवाला मोहांनी भरलेल्या दुनियेत राहूनही मोहांपासून दूर राहण्याचा सुरेख संदेश देत असतात. जीवन जगण्याकरता या फुलाकडून मिळणार हा सल्ला मोलचा ठरतो .

**(२)[१] चौकाट पूर्ण करा .** **(१)**

(अ) भारताचे राष्ट्रीय फुल → [ ]

(ब ) कमळाचा जन्म येथे होतो. → [ ]

**[२] एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

(१) कमळाची पाने मानवाला कोणता संदेश देतात?

## विभाग -२ पद्य

**प्र.२रा ) अ) कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) चौकटी पूर्ण करा .** **(२)**

[१] कवीने झाडाला दिलेली उपमा → ☐

[२] क्षणभर हिरवेगार होणारे → ☐

[३] शरीरभर फुटते → ☐

[४] झाड यांना कवेत घेते → ☐

झाड बसते ध्यानस्थ ऋषीसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत.....
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असत
मुळावर घाव घातला तरी मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहू सरसावलेले असतात मुसाफ़िराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडांचीही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर ? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

**(२) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

[१] झाडाच्या मुळावर घाव घातल्यावर त्याची प्रतिक्रिया काय असते?

[२] झाड पुन्हा नवीन वस्त्र कधी धारण करते ?

**(३) खालील शब्दांचे अर्थ लिहा**. **(२)**

(१) मुकाट (२) मरगळ

(३) झाड (४) मुसाफिर

(४) जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं. या ओळींचा तुम्हाला कळलेलं अर्थ लिहा. **(२)**

**(आ) खालील दोन कवितापैकी कोणत्याही एका कवितेसबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा** .

औक्षण **किंवा** दोन दिवस

**मुद्दे** :-

(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवियत्री **(१)**

(२) प्रस्तुत कवितेचा विषय **(१)**

(३) प्रस्तुत ओळीचा सरळ अर्थ लिहा. **(२)**

औक्षण => "जीव ओवाळावा तरी जीव किती हा लहान

तुझ्या शौर्यगाये पुढे, त्याची केवढीशी शान ;"

**किंवा**

दोन दिवस :- शेकडो वेळा चंद्र आला ; तारे फुलले रात्र धुंद झाली

भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली

(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण **(२)**

**(५) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा.** **(२)**

| औक्षण किंवा | दोन दिवस |
|---|---|
| (१) द्रव्य | (१) ज़िंदगी |
| (२) सामर्थ्य | (२) शेकणे |
| (३) आसवं | (३) बरबाद |
| (४) राखण | (४) साहाय्यास |

## विभाग :- ३ स्थूलवाचन

**प्र.३ रा) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(६)**

(१) "स्काय इज द लिमिट" ही परिस्थिती केंव्हा निर्माण होऊ शकते ते पाठाच्या आधारे लिहा.

(२) पणतीच्या उदाहरणातून 'जाता अस्ताला' या कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

**(३) टीप लिहा.**

व्युत्पत्ती कोशाचे कार्य .

## विभाग ४:- भाषाभ्यास

**प्र.४ था ) अ) व्याकरण घटकावर आधारित कृती .**

**(१) खालील वाक्याचा प्रकार ओळखा .** **(२)**

(अ) आयुष्यात नेहमी सफल व्हा , यशस्वी व्हा .

(आ) आपण आईबाबांच्या इच्छेप्रमाणे वागावे.

**(२) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा.** **(२)**

(अ) त्याने थरथरत्या हातांनी मला नमस्कार केला. (प्रश्नार्थी करा)

(आ) इथले शिक्षक मनानं खूप श्रीमंत होते. ( उद्गारार्थी करा. )

**(३) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन)** **(४)**

(१) आर्जव करणे :-

(२) झोकून देणे :-

(३) गौरव वाटणे :-

(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती .

**(१) शब्दसंपत्ती** :-

**[१] खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **(१)**

{१} अहोरात्र {२} सल्ला

**[२] खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(१)**

{१} नव्या {२} देशी

**[३] शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **(१)**

{१} न बोलण्याचा नियम :-

**[४] वचन बदला .** **(१)**

{१} दगड {२} पैसा

**(२) लेखननियमानुसार लेखन**

**(१) खालील वाक्ये लेखननियमानुसार लिहा.** **(२)**

[१] कवीवर्य नारायण सुर्वे खूप सभा , संमेलन गाजवत.

[२]उतम नागरीक कुणाला म्हणावे ?

**(३) विरामचिन्हे**

**खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा.** **(२)**

{१} फारच भयंकर कल्पना करता येणार नाही असा भयंकर अपघात झाला असता

## विभाग -५ उपयोजित लेखन

**प्र.५ वा ) अ) खालील कृती सोडवा.** **(६)**

**(१) पत्रलेखन**

खूशखबर! खुशखबर ! खुशखबर !

दहावी - बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी

खुशखबर !

बोर्डाच्या परीक्षेनंतरचा श्रमपरिहार

विशेष काश्मीर सहल

१२ एप्रिल ते १९ एप्रिल

संपर्क : ' सुयोग सहल ' महात्मा गांधी पथ , मुंबई

मोबाइल : ********२१

तुमच्या मैत्रिणीला तिच्या वडिलांनी सहलीत सहभागी होण्याची परवानगी द्यावी , म्हणून तिच्या वडिलांना तुम्ही विनंती करणारे पत्र लिहा

**किंवा**

ज्योती कॅटरर्स यांच्याकडे सहलीसाठी पाकिटबंद खाद्यपदार्थांची मागणी तुमचे गटप्रमुख नोंदवत आहेत , अशी कल्पना करा. या खाद्यपदार्थंचे मागणी पत्र तयार करा.

**किंवा**

**(२) सारांशलेखन**

विभाग -१ गद्य (इ) (प्र.क्र.१ इ) मधील अपठित उताऱ्याचे १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** **(१0)**

**(१) जाहिरातलेखन**

[१] पुढे दिलेल्या विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.

उन्हाळी शिबिराचे आयोजन

**(२) बातमीलेखन**

दिलेल्या शब्दावरून बातमी तयार करा.

शाळा ----कोरोना----मोबाईल ------ शिक्षण सुरू--- अभ्यासक्रम ----समस्या

**(३) कथालेखन**

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.


ओम नावाचा तरुण --- साधारण जीवनशैली------- अडगळीतील वस्तू ----- कल्पनाशक्तीचा वापर ----- जोडणी ---- शेतीसाठी उपयुक्त यंत्र निर्मीती ----- उपयोग ----- राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त ---- बोध .

**(इ) लेखनकौशल्य** **(८)**

खालील लेखन प्रकारांपैकी कोणतेही एक कृती सोडवा .


(१) प्रसंग लेखन

पुढील मुद्दे वाचा दिलेल्या प्रसंगाचे वर्णन करा.





**(२) आत्मकथा**

पुढील मुद्द्यातील घटक तुमच्याशी बोलत आहे .अशी कल्पना करून त्या घटकाचे आत्मकथा लिहा.




**(३) वैचारिक**




*************